**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**

नगरसचिव विभाग

प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ५७ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - १८७** **दिनांक – १८/०८/२०२५**

**विभाग – आस्थापना विभाग**

---

**प्रस्तावाचा विषय** – १५ व्या वित्त आयोगाच्या रकमेचा परस्पर स्वत : च्या कामाकरिता वापर केल्याने डॉ. श्री. अनिल अशोक बोरगे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांना महानगरपालिका सेवेतून निलंबित केले बाबत.

--**--

**ठराव** – विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार, डॉ. अनिल अशोक बोरगे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांना संदर्भ क्र. १ अन्वये निलंबित करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका १९४९ प्रकरण चार मध्ये शास्ती लादणे मधील ५६ (१) (ब) मध्ये कलम ४५ अन्वये नियुक्त करण्यात आलेला अधिकारी असेल तर असे निलंबन व त्या संबंधीची कारणे आयुक्ताने ताबडतोब महानगरपालिकेस कळविली पाहिजेत." असे नमुद केलेले आहेत. सदर चा प्रस्ताव महासभेस अवलोकोन साठी विभागाने प्रस्तावीत केले आहे.

आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचाालक राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाष्ट्र शासन याचे अर्ध शासकीय प्रत्र जावक क्र. आआसे/ एन टी इपी / २०११७-२०/२४ दि. १९/०९/२०२४ अन्वये आरोग्य कार्यक्रमांचे रॅकींग बाबतच्या पत्राच्या अनुषंगाने प्रतीमहा प्राप्त झालेल्या अहवालानुसार अहिल्यानगर महानगरपलिकेचा मागील १० महिन्याची प्रतवारी ही सर्व २७ महानगरपलिकेमध्ये अत्यंत निच्चांक पातळीवर असल्याचे कळविण्यात आले, या करणास्तव वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांना सुधारणा करणे बाबत सुचीत करून देखील त्यामध्ये सुधाराणा न झाल्याचे दिसुन आले. या कराणास्तव श्री. अनिल अशोक बोरगे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांना सक्तीच्या रजेवर पाठवीण्यात आले आहे. वैद्यकीय आरोग्य विभागाबाबत सातत्याने नागरीकांच्या तक्रारी च्या कारणास्तव आस्था. जा. क्र. २६४ दि. १६/०१/२०२५ अन्वये आरोग्य विभागातील सर्व कामकाजाचे तपासणी करणे आवश्यक असल्याने त्रिसदस्यीय समीतीची स्थापना करून आरोग्य विभागातील कामकाजाची तपासणी करण्यात आली. सदर समीतीने तपासणी अहवाल सादर करून १ ते १२ मुद्दे बाबत अक्षेप काढलेले आहे. या मध्ये मुद्दा क्र. १ व २ आर्थिक अपहाराबाबत असल्याने डॉ. अनिल बोरगे. वेद्यकीय आरोग्य अधिकारी यांना स्टेट बॅक ऑफ इंडियाचे खाते हाताळण्याचे संयुक्त अधिकार मेकर म्हणुन श्री. विजय कुमार महादेव रणदिवे ( शहर लेखा व्यवस्थापक ) व चेकर म्हणुन डॉ. अनिल बोरगे. वेद्यकीय आरोग्य अधिकारी यांना होते. वेद्यकीय आरोग्य अधिकारी श्री. बोरगे व श्री. विजयकुमार रणदिवे, शहर लेखा व्यवस्थापक यांचे विरूध्द फौजदारी गुन्हा रजि. नं. ८८/२०२५ भा. द. वि. कलम ४०९, ४२०, ३४ प्रमाणे कोतवाली पोलीस स्टेशन अहिल्यानगर येथे दाखल करण्यात आला. या बाबत त्यांना

दि. १२/०२/२०२५ रोजी अटक झालेली आहे. तसेच अटक होवून यांना ५ दिवसाची पोलीस कस्टडी देण्यात आलेली आहे.

डॉ. बोरगे यांनी कर्तव्यात नितांत सचोटी व कर्तव्य पारायणता न ठेवता लोकसेवक म्हणून स्वत च्या पदाचा व अधिकाराचा दुरपयोग / गैरवापर करून गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन करून महानगरपलिका कर्मचा-यास अशोभनिय ठरेल असे गैरवर्तन केल्याचे स्पष्ट होत आहे. त्यांचे गैरवर्तनाने महानगरपालिकेची जनमाणसांतील प्रतिमा मलिन होवून महाराष्ट्र नागरी सेवा ( वर्तणूक ) नियम १९७९ मधील नियम ३ (१) ( एक ) ( दोन ) ( तीन ) (१) मधील तरतुदींचा भंग केलेला आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा ( शिस्त व अपील ) नियम १९७९ मधील भाग २ निलंबन मधील ४/२ (अ) मध्ये नमुद केलेनुसार फौजदारी आरोपाखाली किंवा अन्यथा अटक करून ४८ तासाहून अधिक काळ पोलीस कस्टडी झालेली आहे.

डॉ. अनिल अशोक बोरगे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी महाराष्ट्र महानगरपलिका अधिनियमाचे कलम ५६ (२) (फ) मधील तरतूदीनुसार आस्था. जा. क्र.६७६ दि. २१/०२/२०२५ अन्वये दिनांक १२/०२/२०२५ पासुन महानगरपलिका सेतेतून निलंबित करण्यात आलेले आहे.

डॉ. अनिल अशोक बोरगे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी याचे निलंबना बाबत विभागीय चौकशीचे निर्णय होईपर्यत निलंबन कायम करणेत येत आहे यास मा. प्रशासक सर्व साधारण सभा मजूरी देत आहे

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

( सही )
( मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

( सही )
( यशवंत डांगे )
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका